# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/R / 214 / 2009 / 48 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect of Chairman, Vijay Sahkari Grah Nirman Sanstha Maryadit, Kanchanwadi, Aurangabad. Aurangabad.

Dear Sir,

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from C**hairman, Vijay Sahkari Grah Nirman Sanstha Maryadit, Kanchanwadi, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. **The hearing in the matter will be held on** 0**2.06.2009 at 12=00 Hrs.**

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

**Copy to:-**
The Chairman,
Vijay Sahkari Grah Nirman Sanstha Maryadit,
Kanchanwadi,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१४/२००९/४८**

**तक्रार दाखल दिनांक :- १९/०५/२००९**
**निकाल दिनांक :- १८/०७/२००९**

**मे चेअरमन,**
**विजय सहकारी गृहनिमार्ण संस्था म.,**
**कांचनवाडी ,तालुका औरंगाबाद,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १९/०५/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार हे विजय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत या संस्थेचे अध्यक्ष असुन त्यांच्या संस्थेची गट नंबर ३६ कांचनवाडी येथे जमीन आहे. त्यांनी सदरील जागेचा लेआऊट तयार करुन महानगर पालीका औरंगाबाद यांना मजुरीसाठी पाठविला सदरील लेआऊटची मजुरी देतांना जागेत येणारे विद्युत खांब त्यावरील लाईन काढण्याचे बंधन महानगर पालीकाने घातले असल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत म्हटले आहे.अर्जदार यांनी म.रा.वि.म.(सध्याची महावितरण कंपनी) यांच्याकडे विद्युतखांब काढण्यासाठी दिनांक ०७/०३/२००० रोजी अर्ज केला व वीज मंडळाने मागणी केल्याप्रमाणे १,२०,२५०/- रुपये त्यापोटी भरले आहेत. अर्जदार यांनी अनेकवेळा विद्युत खांब हटविण्यासाठी महावितरण कंपनीकडे पाठपुरावा केला पण याबाबत कोणतीही कारवाई करण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असुन विद्युत खांब हाटविण्याबाबत आदेश देण्याची अन्यथा व्याजासहीत रक्कम परत करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०२/०६/२००९ झालेल्या सुनावणीस अर्जदार एस.एन.डांगे उपस्थित होते. महावितरणचे शहर तसेच ग्रामीण विभागाचे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर तसेच कु एस.बी.चिवंडे उपस्थित होते. दोन्ही नोडल अधिकारी

यांनी काचंनवाडी येथील अर्जदाराची जागा शहर किंवा ग्रामीण क्षेत्रात येते याबाबत आपसात वाद घातला मंचाने त्यांना सदरील जागेची एकत्रीत पाहणी करुन जागा कोणाच्या क्षेत्रात येते याबाबतची  माहीती पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे आदेश दिले व पुढील सुनावणी दिनांक ०९/०६/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०९/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व शहर विभागाचे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी जागेची पाहणी करण्यात आली नसल्याचे सांगितले मंचाने याबाबतीत नाराजी दर्शविली पुढील सुनावणीच्या वेळी जागेची पाहणी अहवाल मंचात दाखल करण्याचे आदेश दिले व सुनावणी दिनांक १६/०६/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १६/०६/२००९ रोजी अर्जदार तसेच शहर विभागाचे नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी रेल्वस्टेशन उपविभागाच्या कनिष्ठ अभियंता याने जागेची पाहणी केली असल्याचे सांगितले. पण त्याचा अहवाल आला नसल्यामुळे तो मंचात दाखल करता येत नसल्याचे सांगितले सुनावणी दरम्यान छावणी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री गायकवाड यांनी  अर्जदाराने विद्युत खांब काढण्यासाठी त्यांच्याकडे पाठपुरावा केला नसल्याचे सांगितले व सामान उपलब्ध झाल्यास विद्युत खांब हलविण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे मोघम उतर दिले. नोडल अधिकारी यांनी ३० जुलै २००९ पर्यत विद्युत खांब हटविण्याचे आश्वासन मंचास दिले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन तसेच मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की,अर्जदार यांनी त्यांच्या संस्थेच्या जागेतील वीज पोल काढण्यासाठी म.रा.वि.मंडळाला कडे १,२०,२५०/-रुपये रक्कम ०४/११/२००० रोजी भरली त्यावेळी काचंनवाडी हा भाग ग्रामीण विभागाकडे येत होता. २००१ साली हा भाग शहर विभागाबरोबर जोडला गेला. अर्जदाराने याबाबतीत महावितरणच्या संबंधित विभागाकडे विजखांब हलविण्याबाबत प्रयत्न केल्याचे त्यांनी महावितरण कंपनी बरोबर केलेल्या पत्र व्यवहारावरुन दिसुन येते. अर्जदाराने लोकमत हेल्प लाईन माध्यमातुन देखील याबाबत प्रयत्न केल्याचे दिसुन येते पण अर्जदार यांनी मंचात तक्रार दाखल करेपर्यंत त्यांच्या अर्जची महावितरण वीज कंपनीकडुन दखल घेण्यात आली नसल्याचे दिसुन येते. अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर व सुनावणी दरम्यान मंचाने दोन वेळा आदेश देवुनही जागेची पाहणी करण्यात आली नाही. यावरुन महावितरणच्या संबंधित अधिकारी ग्राहकांच्या तक्रारीकडे तसेच मंचाच्या आदेशाकडे किती गांर्भीयाने पाहतात हे चित्र मंचासमोर आले. अर्जदाराने ०४/११/२००० मध्ये रक्कम भरल्यानंतर आजपर्यंत वीज खांब हलविण्याचे काम झाले नाही व ते मटेरिअल उपलब्ध झाल्यानंतर करण्यात येईल असे बेजवाबदारपणाचे उत्तर मंचासमोर महावितरणतर्फे देण्यात आले.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यानंतर अर्जदाराने केलेली तक्रार योग्य असल्याचे तसेच तो नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे मंचाचे मत आहे.मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदाराच्या जागेवरील पोल हलविण्याचे काम हा आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आंत पर्यंत पुर्ण करावे.

२) महावितरण कंपनीने अर्जदाराने भरलेली एकुण रक्कम ही १,२०,२५०/-+ ६% व्याज दराने डिसेंबर २००० ते कामपुर्ण होईपर्यंत व्याज अशी धरण्यात यावी.वीज खांब हलविण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचा लेखाजोखा अर्जदारास व मंचास कळवावा.

३) अर्जदाराने ओ. आर. सी. अंतर्गत रक्कम भरली असल्यामुळे महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास व मंचास किती रक्कमेचे काम झाले याबाबत कळवावे.

४) महावितरण कंपनीने अर्जदारास नुकसान भरपाई म्हणुन १०००/-रुपये द्यावेत तसेच हा आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आंत काम पुर्ण न केल्यास रुपये १००/-प्रतिदिन याप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१४/२००९/४८** **दिनांक :-**

**प्रति,**
**मे चेअरमन,**
**विजय सहकारी गृहनिमार्ण संस्था म.,**
**कांचनवाडी ,तालुका औरंगाबाद,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रा/२१४/२००९/४८ )

आपण दिनांक १९/०५/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**